# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 22.03.2026** **वार- रविवार**

---

**उपराष्ट्रपती**

भारताच्या प्राचीन उपचार पद्धती केवळ शारीरिक नाही, तर मानसिक आरोग्यासाठी उपयुक्त आहेत, हाच विचार महात्मा गांधींनी 80 वर्षापूर्वी निसर्गोपचार केंद्राच्या माध्यमातून आपल्याला दिला, त्यामुळं आपण सर्वांनी नैसर्गिक जीवनशैलीच्या माध्यमातून निसर्गाच्या जवळ जायला हवं असं आवाहन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी केलं. ते आज पुण्यातल्या उरुळी कांचन इथं निसर्गोपचार आश्रमाच्या 81व्या वर्धापन दिन सोहळ्यात बोलत होते. यावेळी आश्रमाचे व्यवस्थापकीय विश्वस्त डॉक्टर एन. जी. हेगडे  यांनी लिहिलेल्या सिक्रेट्स ऑफ हॅपिनेस या पुस्तकाचं प्रकाशन उपराष्ट्रपतींच्या  हस्ते करण्यात आलं. राज्यसभेचे उपसभापती हरिवंश नारायण सिंह, राज्यपाल जिष्णु देव वर्मा, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**पुण्यभूषण**

पुण्यभूषण फौंडेशनतर्फे दिला जाणारा मानाचा पुण्यभूषण पुरस्कार यंदा जेष्ठ उद्योगपती अभय फिरोदिया यांना जाहीर झाला आहे. फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉक्टर  सतीश देसाई यांनी आज प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही घोषणा  केली. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखालील निवड समितीने उद्योगपती अभय फिरोदिया यांचं नाव या पुरस्कारासाठी निश्चित केलं. बालशिवाजींची, सोन्याच्या फाळाने पुण्याची भूमी नांगरत असलेली प्रतिकृती आणि पुण्यनगरीच्या ग्रामदैवतांची प्रतिमा असलेलं स्मृतिचिन्ह आणि दोन लाख रूपये असं या पुरस्काराचं स्वरूप आहे.

**जागतिक जलदिन**

जागतिक जल दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पर्यावरण, अभियांत्रिकी आणि पाणीपुरवठा विभागानं तसंच डॉक्टर डी. वाय. पाटील इन्स्टिट्यूटनं पवना नदी काठावर विविध उपक्रमांचं आज आयोजन केलं होतं. यावेळी जल दिनाचं महत्त्व, पाण्याचं संवर्धन, जलस्रोतांचं वाढतं प्रदूषण तसंच नदी, नाले आणि पाणवठ्यांच्या स्वच्छतेची गरज याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आलं. तसंच नदीकाठ परिसरात स्वच्छता मोहीम राबवण्यात आली.

**बालनाट्य महोत्सव**

ज्येष्ठ लेखिका, नाटककार आणि दिग्दर्शिका सई परांजपे लिखित ‘झाली काय गंमत’ या बालनाट्यातील ‘सिंड्रेला’ आणि ‘शेपटीचा  शाप’मधील ‘राणी’नं  आज  पुण्यात बालकलाकारांशी संवाद साधला. संवाद पुणे तर्फे सई परांजपे यांच्या ९०व्या वाढदिवसानिमित्त हा कार्यक्रम आयोजित  करण्यात आला होता. यावेळी सई परांजपे यांनी लिहिलेल्या सहा बालनाट्यांच्या संहितांचे पूजन करण्यात आलं.

**आर्किटेक्ट**

पायाभूत सुविधा, बांधकाम क्षेत्राचा विकास झपाट्यानं होत असून, त्यामध्ये वास्तुरचनाकार म्हणजेच आर्किटेक्ट बहुमूल्य योगदान देत आहेत,असं  मत इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ आर्किटेक्ट्सचे अध्यक्ष विलास अवचट यांनी व्यक्त  केलं.

ते आज पुण्यात आर्किटेक्ट, इंजिनिअर्स अँड सर्व्हेयर्स असोसिएशनतर्फे आयोजित 'एईएसए वार्षिक पुरस्कार' वितरण सोहळ्यात बोलत होते.

**एकल पालकदिन**

मुलांना प्रेमाचा आणि मायेचा आधार हवा असतो, त्यामुळं पालकांनी मुलांशी मैत्र जपायला हवे,त्यातूनच पालकत्व अधिक समृद्ध होत जातं,असं मत मुंबई उच्च न्यायालयाच्या माजी न्यायाधीश मृदुला भाटकर यांनी व्यक्त केलं. त्या आज पुण्यात राष्ट्रीय एकल पालक दिवसाच्या निमित्तानं क्रिसेंट म्युच्युअल फंड डिस्ट्रिब्युटर्सतर्फे आयोजित एकल पालक संमेलनात बोलत होत्या. संघर्षाला सामोरं जात आपल्या मुलांना घडवणाऱ्या काही एकल पालकांचा विशेष सन्मान यावेळी करण्यात आला.

**युरिया तुटवडा**

पुण्यातल्या आंबेगाव तालुक्यात गॅस सिलेंडर नंतर आता युरिया खतासाठी दुकानांमध्ये शेतकऱ्यांच्या रांगा लागल्याचं चित्र दिसून येत आहे. आखाती देशांकडून सुमारे 75 टक्के युरिया आयात केला जातो, मात्र युद्धामुळं पुरवठ्यात अडथळे निर्माण होत असल्यानं शेतकरी आणि सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाल्याचं दिसून येत आहे.

**रिक्षाटॅक्सी**

धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ऑटो रिक्षा आणि मीटर टॅक्सीचालक-मालक कल्याणकारी मंडळांतर्गत सभासद नोंदणी प्रक्रिया आता अधिक सुलभ झाली आहे. ऑनलाइन अर्ज भरताना रिक्षाचालकांना येणाऱ्या तांत्रिक अडचणी विचारात घेऊन, पुण्याच्या प्रादेशिक परिवहन कार्यालयानं विशेष पाऊल उचललं असून, कार्यालयात मदतीसाठी सोमवार ते शुक्रवार या दिवसात सकाळी 11 ते दुपारी 1 या वेळेत विशेष कर्मचारी नियुक्त केले आहेत. पात्र अर्जदारांनी आरटीओ कार्यालयाला प्रत्यक्ष भेट देऊन नोंदणी करावी किंवा 020-26058080 या क्रमांकावर मदतीसाठी संपर्क साधावा असं आवाहन करण्यात आलं आहे.

**कृषीबाजार**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज विविध राज्यातून सुमारे 100 ट्रक फळभाज्यांची आवक झाली. आवक-वाढल्यानं दोडका, कैरी, कारलीसह विविध फळभाज्यांच्या भावात घट झाली. बहुतांश पालेभाज्यांचे भाव स्थिर आहेत. द्राक्ष, मोसंबी या उन्हाळी रसाळ फळांचे भाव खाली आले असून जवळपास सर्वच फुलांचे भाव 20 ते 30 टक्क्यांपर्यंत खाली आले आहेत.

**कुस्ती**

68व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी पुण्यातील वाघोलीचं कुस्ती मैदान आज सज्ज झालं आहे. गादी विभागातून सोलापूरचा जय पाटील आणि नाशिकचा हर्षवर्धन सदगीर, तर माती विभागात सिकंदर शेख विरुद्ध महेंद्र गायकवाड असा मुकाबला रंगणार आहे. स्पर्धेतील विजेत्याला मानाची गदा, 5 लाख रुपये आणि चार चाकी गाडीचं बक्षीस दिलं जाणार आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज दिवसभरात कमाल 34 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद करण्यात आली.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**